सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

# असाधारण भाग चार

वर्ष २, अंक १] मंगळवार, मार्च ३०, २०१०/चैत्र ९, शके १९३२ [पृष्ठे ६, किंमत : रुपये २६.००

## असाधारण क्रमांक ६

## प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

अनुक्रमणिका

| | पृष्ठे |
|---|---|
| **सन २०१० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २.**—मुंबई करमणूक शुल्क अधिनियम, १९२३ यात आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम. | १-६ |

दिनांक ३० मार्च २०१० रोजी माननीय राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**ह. बा. पटेल,**
सचिव,
महाराष्ट्र शासन,
विधी व न्याय विभाग.

## सन २०१० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २.

(मा. राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर "**महाराष्ट्र शासन राजपत्रात**" दिनांक ३० मार्च २०१० रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

## मुंबई करमणूक शुल्क अधिनियम, १९२३ यात आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम.

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते ;

१९२३ चा मुंबई १. २००९ चा महा.अध्या. २३.

**आणि ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी, मुंबई करमणूक शुल्क अधिनियम, १९२३ यात आणखी सुधारणा करण्यासाठी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती ; आणि, म्हणून, त्यांनी दिनांक ३१ ऑगस्ट २००९ रोजी मुंबई करमणूक शुल्क (सुधारणा) अध्यादेश,२००९ प्रख्यापित केला होता ;

**आणि ज्याअर्थी,** उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रूपांतर करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या साठाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ. **१.** (१) या अधिनियमास, मुंबई करमणूक शुल्क (सुधारणा) अधिनियम, २००९ असे म्हणावे.

(२) तो, दिनांक ३१ ऑगस्ट २००९ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

सन १९२३ चा मुंबई अधिनियम क्रमांक १ याच्या कलम २ ची सुधारणा. **२.** मुंबई करमणूक शुल्क अधिनियम, १९२३ (यात यापुढे ज्याचा निर्देश "मुख्य अधिनियम" असा करण्यात आला आहे), याच्या कलम २ मध्ये,— १९२३ चा मुंबई १.

(क) खंड (अ-२) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :—

"(अ-३) "पुरस्कार समारंभ" याचा अर्थ, चित्रपट किंवा दूरचित्रवाणी उद्योगाच्या प्रातिनिधिक संस्थांकडून किंवा प्रसारमाध्यमाच्या यंत्रणेकडून गाण्याचे किंवा नृत्याचे कार्यक्रम किंवा इतर प्रयोग यांच्या बहुरंगी कार्यक्रमांसह आयोजित करण्यात आलेला पुरस्कार वितरण समारंभ किंवा शासन याबाबतीत अधिसूचनेद्वारे **राजपत्रात** विनिर्दिष्ट करील, असा अन्य पुरस्कार समारंभ, असा आहे ; " ;

(ख) खंड (ब) मध्ये,—

(एक) दुसऱ्या परंतुकातील, "साधारण व वातशीतल चित्रपटगृहाच्या बाबतीत तीन रुपयांहून आणि वातानुकूलित चित्रपटगृहाच्या बाबतीत चार रुपयांहून" या मजकुराऐवजी, "साधारण व वातशीतल चित्रपटगृहाच्या बाबतीत पाच रुपयांहून आणि वातानुकूलित चित्रपटगृहाच्या बाबतीत सहा रुपयांहून" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(दोन) पाचव्या परंतुकानंतर, पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येईल :—

"परंतु आणखी असे की, सॅटेलाईटमार्फत माहिती तंत्रज्ञानाच्या सहाय्याने संगणकीकृत तिकीट टर्मिनल नेटवर्क असणाऱ्या स्थायी किंवा स्थायीवत चित्रपटगृहाच्या मालकाने अतिरिक्त सेवा आकार म्हणून प्रत्येक तिकिटामागे पन्नास पैसे इतकी रक्कम स्वतंत्रपणे आकारलेली असेल तर, अशा प्रकरणात, अतिरिक्त सेवा आकारापोटी दिलेल्या अशा रकमेचा, प्रवेश मिळण्यासाठी दिलेल्या रकमेमध्ये समावेश केला जाणार नाही ; " ;

(ग) खंड (क) मधील, उप खंड (बारा) नंतर, पुढील उप-खंड जादा दाखल करण्यात येईल :—

"(तेरा) पर्यटन धोरण—२००६ अन्वये पर्यटन विकास महामंडळाने ज्या कोणत्याही पर्यटन प्रकल्पास पात्रता प्रमाणपत्र दिले आहे त्या प्रकल्पाच्या व्यवस्थापनास जबाबदार असणारी किंवा त्यावेळी त्याची प्रभारी असणारी व्यक्ती ; " ;

(घ) खंड (फ) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :—

"(फ-अ१) "शासनाने प्रायोजित केलेला सांस्कृतिक महोत्सव" याचा अर्थ, राज्य शासन किंवा शासनाचा उपक्रम किंवा स्वायत्त संस्था यांनी आयोजित केलेला, प्रायोजित

किंवा सह-प्रायोजित केलेला महोत्सव किंवा कार्यक्रम किंवा शासन याबाबतीत अधिसूचनेद्वारे **राजपत्रात** विनिर्दिष्ट करील, असा अन्य सांस्कृतिक महोत्सव किंवा शैक्षणिक संस्था यांच्याद्वारे आयोजित केलेला सांस्कृतिक महोत्सव, असा आहे ; " ;

(ड) खंड (आय) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येतील :—

१९५६ चा १. " (आय-अ) " पर्यटन विकास महामंडळ " याचा अर्थ, कंपनी अधिनियम, १९५६ अन्वये नोंदणी झालेली महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ मर्यादित ही कंपनी, असा आहे ;

(आय-ब) " पर्यटन धोरण—२००६ " याचा अर्थ, शासन निर्णय, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, क्रमांक एमटीसी. २००५/२/प्र.क्र. १७२/पर्यटन, दिनांक १६ डिसेंबर २००६ अन्वये, महाराष्ट्र शासनाने तयार केलेले पर्यटन धोरण, असा आहे ;

(आय-क) " पर्यटन प्रकल्प " याचा अर्थ, पर्यटन धोरण—२००६ अन्वये, प्रोत्साहनांकरिता एखादे पात्र घटक म्हणून पात्र असलेले पुढील प्रकल्प, असा आहे :—

(१) पर्यटन विकास महामंडळाच्या बिछाना आणि न्याहारी योजनेखालील हॉटेले, पारंपरिक हॉटेले, रिसोर्ट आणि आरोग्य क्षेत्रे, आरोग्य आणि निरोगीपणा स्पा आणि युनिटे ;

(२) मॉटेल्स आणि रस्त्यावरील सोयीसुविधा ;

(३) वेश्म हॉटेले किंवा सेवा दालने ;

(४) जलक्रीडा आणि मनोरंजन उद्याने ;

(५) कला व हस्तकलांची गावे ;

(६) गोल्फ कोर्सेस ;

(७) छावणी, काफला आणि तंबू सोयीसुविधा ;

(८) हवाई रज्जू मार्ग ;

(९) संकेत केंद्रे ;

(१०) थंड हवेच्या ठिकाणांचा विकास ;

(११) साहस पर्यटन प्रकल्प ;

(१२) हाऊसबोटी ;

(१३) पर्यावरणानुकूल पर्यटन प्रकल्प ;

(१४) संग्रहालये आणि मत्स्यालये ;

(१५) महाराष्ट्र शासनाच्या किंवा भारत सरकारच्या पर्यटन विभागाच्या वर्गीकरण समितीने मान्य केलेले प्रकल्प ; ".

**३.** मुख्य अधिनियमाच्या कलम ३ मध्ये,— सन १९२३ चा मुंबई अधिनियम क्रमांक १ याच्या कलम ३ ची सुधारणा.

(क) पोट-कलम (१) मधील, खंड (ब) मध्ये, तिसऱ्या परंतुकानंतर, पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येईल :—

" परंतु आणखी असे की, तिकीट विक्री न करता, केवळ निमंत्रितांसाठी आयोजित केलेल्या पुरस्कार समारंभाच्या बाबतीतील करमणूक शुल्क हे, अशा समारंभासाठी प्राप्त झालेल्या प्रयोजकत्त्वाच्या एकूण रकमेच्या १२.५ टक्के इतके असेल. " ;

(ख) पोट-कलम (१७) नंतर, पुढील पोट-कलमे जादा दाखल करण्यात येतील :—

"(१८) या अधिनियमाच्या पोट-कलम (१) च्या खंड (ब) किंवा अन्य कोणत्याही तरतुदी यांमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, शासनाने प्रायोजित केलेल्या सांस्कृतिक महोत्सवाच्या बाबतीत कोणतेही शुल्क आकारले जाणार नाही.

(१९)(अ) या अधिनियमाच्या अन्य कोणत्याही तरतुदींमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी परंतु खंड (ब) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या अटी व शर्ती यांना अधीन राहून, मुंबई करमणूक शुल्क (सुधारणा) अधिनियम, २००९ अंमलात आल्याच्या दिनांकास व त्या २०१० चा महा. २ दिनांकापासून पुढीलपैकी अशा कोणत्याही पर्यटन प्रकल्पाच्या संबंधात करमणूक शुल्क आकारण्यात येईल आणि पर्यटन प्रकल्पाच्या मालकाकडून ते राज्य शासनाकडे प्रदान करण्यात येईल :—

(एक) अनुक्रमे परिमंडल अ, परिमंडल ब आणि परिमंडल क मधील पर्यटन प्रकल्प प्रारंभ होण्याच्या दिनांकापासून पहिल्या पाच वर्षांच्या, सात वर्षांच्या व दहा वर्षांच्या कालावधीकरिता, कोणतेही शुल्क नाही ;

(दोन) अनुक्रमे परिमंडल अ, परिमंडल ब आणि परिमंडल क मधील पर्यटन प्रकल्प प्रारंभ होण्याच्या दिनांकाच्या नंतरच्या सहा वर्षे, आठ वर्षे व अकरा वर्षांच्या पुढील कालावधीकरिता, पोट-कलम (१) च्या खंड (ब) मध्ये, किंवा यथास्थिति, उक्त पर्यटन प्रकल्पामध्ये वेळोवेळी तरतूद केलेल्या करमणुकीच्या प्रकाराला लागू असणाऱ्या, कलम ३ च्या अन्य कोणत्याही पोट-कलमांमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या दराने, बसविण्यायोग्य असलेल्या करमणूक शुल्काची संपूर्ण रक्कम आकारण्यात येईल :

परंतु, आकारावयाचे करमणूक शुल्क, जेथे जेथे लागू असेल तेथे तेथे कलम ३ च्या पोट-कलम (२) च्या तरतुदींनादेखील अधीन असेल.

**स्पष्टीकरण.**— या पोट-कलमाच्या प्रयोजनार्थ,—

(एक) पर्यटन धोरण—२००६ अन्वये, पर्यटन विकास महामंडळाने दिलेल्या पात्रता प्रमाणपत्राचा दिनांक हा, उक्त पर्यटन प्रकल्पाचा प्रारंभाचा दिनांक असल्याचे मानण्यात येईल ;

(दोन) पर्यटन प्रकल्पाच्या व्यवस्थापनातील बदल, किंवा पर्यटन प्रकल्पाच्या नावातील बदल हा पर्यटन प्रकल्पाचा नव्याने प्रारंभ, असा अर्थ लावण्यात येणार नाही.

(ब) खंड (अ) अन्वये तरतूद केल्याप्रमाणे करमणूक शुल्कातील सवलत ही, पुढील अटी व शर्तींना अधीन राहून, पर्यटन प्रकल्पाच्या मालकाला उपलब्ध असेल :—

(एक) परिमंडल अ, परिमंडल ब आणि परिमंडल क मधील पर्यटन प्रकल्प, अनुक्रमे दहा वर्षे, चौदा वर्षे व वीस वर्षे या कालावधीकरिता सलग चालू ठेवण्यात येतील ;

(दोन) पर्यटन धोरण—२००६ मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे, पर्यटन प्रकल्पामध्ये पुरविण्यात आलेल्या कोणत्याही सोयीसुविधा राज्य शासनाच्या पूर्वपरवानगीशिवाय खंडित करता येणार नाहीत किंवा त्यात कपात करता येणार नाही ;

(तीन) पर्यटन धोरण—२००६ नुसार विनिर्दिष्ट केलेल्या अटी व शर्तींचा भंग करणार नाही.

(क) खंड (ब) मधील, शर्त (एक), (दोन) किंवा (तीन) चा भंग केल्यास, सवलत काढून घेतली जाण्यास पात्र असेल आणि पोट-कलम (१) च्या खंड (ब) मध्ये, किंवा यथास्थिति, उक्त पर्यटन प्रकल्पामध्ये, वेळोवेळी, तरतूद केलेल्या करमणुकीच्या प्रकाराला लागू असलेल्या कलम ३ च्या अन्य कोणत्याही पोट-कलमांमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या दराने, पर्यटन प्रकल्पाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून करमणूक शुल्क, त्याच बरोबर कलम ९ब मध्ये समाविष्ट केलेल्या दराने आकारण्यायोग्य असलेले व्याज आकारण्यात येईल व वसूल करण्यात येईल :

परंतु, कोणत्याही कारणास्तव, संबंधित पर्यटन प्रकल्प विहित कालावधीकरिता चालू ठेवण्यात आला नसल्यास, पोट-कलम (१) च्या खंड (ब) मध्ये, किंवा यथास्थिति, उक्त पर्यटन प्रकल्पामध्ये, वेळोवेळी, तरतूद केलेल्या करमणुकीच्या प्रकाराला लागू असलेल्या कलम ३ च्या अन्य कोणत्याही पोट-कलमांमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या दराने. पर्यटन प्रकल्पाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून करमणूक शुल्क, त्याच बरोबर कलम ९ब मध्ये समाविष्ट केलेल्या दराने आकारण्यायोग्य असलेले व्याज आकारण्यात येईल व वसूल करण्यात येईल.

**स्पष्टीकरण.—** या पोट-कलमाच्या प्रयोजनार्थ,—

(अ) परिमंडल अ मध्ये मुंबई उपनगर जिल्हा, मुंबई, नवी मुंबई, ठाणे व पुणे महानगरपालिका व पिंपरी-चिंचवड महानगरपालिका यांच्या सीमांच्या आत येणाऱ्या क्षेत्रांचा समावेश असेल ;

(ब) परिमंडल ब मध्ये परिमंडल अ मध्ये समावेश नसलेल्या सर्व महानगरपालिका आणि अ वर्ग नगरपरिषदांमध्ये येणारी क्षेत्रे यांच्या सीमांच्या आत येणाऱ्या इतर सर्व क्षेत्रांचा समावेश असेल ;

(क) परिमंडल क मध्ये परिमंडल अ आणि परिमंडल ब मध्ये समावेश नसलेल्या महाराष्ट्र राज्यातील सर्व जिल्ह्यांमधील सीमांच्या आत येणाऱ्या इतर सर्व क्षेत्रांचा समावेश असेल.”.

सन २००९ या महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २३ याचे निरसन व व्यावृत्ती.

**४.** (१) मुंबई करमणूक शुल्क (सुधारणा) अध्यादेश, २००९ हा, याद्वारे, निरसित करण्यात येत आहे. २००९ चा महा. अध्या. २३.

(२) असे निरसन झाले असले तरी, उक्त अध्यादेशान्वये सुधारणा केल्याप्रमाणे, मुख्य अधिनियमान्वये करण्यात आलेली कोणतीही कृती किंवा कार्यवाही (काढण्यात आलेली कोणतीही अधिसूचना किंवा आदेश यांसह) ही, या अधिनियमान्वये सुधारणा केल्याप्रमाणे मुख्य अधिनियमाच्या संबंधित तरतुदींन्वये करण्यात आलेली कोणतीही कृती किंवा कार्यवाही किंवा, यथास्थिती, काढण्यात आलेली अधिसूचना किंवा आदेश असल्याचे मानण्यात येईल.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.

# महाराष्ट्र शासन राजपत्र
# असाधारण भाग आठ

वर्ष २, अंक ५(२)] मंगळवार, मार्च ३०, २०१०/चैत्र ९, शके १९३२ [पृष्ठे ५, किंमत : रुपये १९.००

असाधारण क्रमांक ११

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम आणि विधि व न्याय विभागाकडून आलेली विधेयके (इंग्रजी अनुवाद).

In pursuance of clause (3) of article 348 of the Constitution of India, the following translation in English of the Bombay Entertainments Duty (Amendment) Act, 2009 (Mah. II of 2010), is hereby published under the authority of the Governor.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

H. B. PATEL,
Secretary to Government,
Law and Judiciary Department.

## MAHARASHTRA ACT No. II OF 2010.

*(First published, after having received the assent of the Governor, in the " Maharashtra Government Gazette", on the 30th March 2010).*

An Act further to amend the Bombay Entertainments Duty Act, 1923.

WHEREAS both Houses of the State Legislature were not in session ;

AND WHEREAS the Governor of Maharashtra was satisfied that circumstances existed which rendered it necessary for him to take immediate action further to amend the Bombay Entertainments Duty Act, 1923, for the purposes hereinafter appearing ; and, therefore, promulgated the Bombay Entertainments Duty (Amendment) Ordinance, 2009, on the 31st August 2009 ;

Bom. I of 1923. Mah. Ord. XXIII of 2009.

AND WHEREAS it is expedient to replace the said Ordinance by an Act of the State Legislature; it is hereby enacted in the Sixtieth Year of the Republic of India as follows :—

Short title and commencement.

**1.** (*1*) This Act may be called the Bombay Entertainments Duty (Amendment) Act, 2009.

(*2*) It shall be deemed to have come into force on the 31st August 2009.

Amendment of section 2 of Bom. I of 1923.

**2.** In section 2 of the Bombay Entertainments Duty Act, 1923 (hereinafter referred to as " the principal Act"),— Bom. I of 1923.

(*a*) after clause (*a-2*), the following clause shall be inserted, namely :—

"(*a-3*) "Award Function" means the award distribution programme organised by the representative bodies of the Film or Television Industry or Media organisations with intermittent performance of songs or dances or other performances or such other award function as the State Government may, by notification in the *Official Gazette,* specify in this behalf; " ;

(*b*) in clause (*b*),—

*(i)* in the second proviso, for the words " three rupees in case of ordinary and air-cooled cinemas and four rupees in case of air-conditioned cinemas" the words " five rupees in case of ordinary and air-cooled cinemas and six rupees in case of air-conditioned cinemas" shall be substituted;

*(ii)* after the fifth proviso, the following proviso shall be added, namely :—

"Provided also that, any payment of fifty *paise* per ticket if charged by the proprietor of a permanent or quasi-permanent cinema having computerised ticket terminal network with the help of information technology through satellite, towards additional service charges, separately, in that case, such payment towards additional service charges shall not be included in the payment for admission;";

(*c*) in clause (*c*), after sub-clause (*xii*), the following sub-clause shall be added, namely :—

"(*xiii*) responsible for or for the time being in charge of, the management of any Tourism Project to which the eligibility certificate is issued by the Tourism Development Corporation under the Tourism Policy- 2006 ; " ;

(*d*) after clause (*f*), the following clause shall be inserted, namely :—

"(*f-a1*) "Government Sponsored Cultural Festival" means the festival or programme organised, sponsored or co-sponsored by the State Government or the Government Undertaking or an autonomous body or

such other cultural festival as the State Government may, by notification in the *Official Gazette,* specify in this behalf or the cultural festival organised by the educational institution ; ";

(*e*) after clause (*i*), the following clauses shall be inserted, namely :—

"(*i-a*) "Tourism Development Corporation" means the Maharashtra Tourism Development Corporation Limited, a Company registered under the Companies Act, 1956 ; 1 of 1956.

(*i-b*) "Tourism Policy-2006" means the Tourism Policy formulated by the Government of Maharashtra, under the Government Resolution, Department of Tourism and Cultural Affairs, No. MTC-2005/2/CR-172/ Tourism, dated the 16th December 2006 ;

(*i-c*) "Tourism Project" means the following project, which is eligible as an Eligible Unit for the incentives under the Tourism Policy-2006, namely :—

(*1*) Hotels, Heritage Hotels, Resorts and Health Farms, Health and Wellness Spa and units registered under the Bed and Breakfast Scheme of the Tourism Development Corporation ;

(*2*) Motels and wayside amenities ;

(*3*) Apartment Hotels or Service Apartments ;

(*4*) Water Sports and Amusement Parks ;

(*5*) Arts and Crafts Villages ;

(*6*) Golf Courses ;

(*7*) Camping, Caravanning and Tent Facilities ;

(*8*) Aerial Ropeways ;

(*9*) Convention Centres ;

(*10*) Development of Hill Stations ;

(*11*) Adventure Tourism Projects ;

(*12*) Houseboats ;

(*13*) Eco-Tourism Projects ;

(*14*) Museums and Aquariums ;

(*15*) Projects approved by the Classification Committee of the Tourism Department of the Government of Maharashtra or the Government of India ; ".

**3.** In section 3 of the principal Act,— Amendment of section 3 of Bom. I of 1923.

(*a*) in sub-section (*1*), in clause (*b*), after the third proviso, the following proviso shall be added, namely :—

"Provided also that, the entertainment duty in respect of the Award Function organised only for

invitees, without selling tickets, shall be 12.5 per cent. of the total sponsorship amount received for such function. ";

(*b*) after sub-section (*17*), the following sub-sections shall be added, namely :—

" (*18*) Notwithstanding anything contained in clause (*b*) of sub-section (*1*) or any other provisions of this Act, no duty shall be levied in respect of the Government Sponsored Cultural Festival.

(*19*)(*a*) Notwithstanding anything contained in any other provisions of this Act, but subject to the terms and conditions specified in clause (*b*), on and with effect from the date of coming into force of the Bombay Entertainments Duty (Amendment) Act, 2009, there shall be levied, and paid by the proprietor of a Tourism Project to the State Government the entertainment duty in respect of any such Tourism Project as follows, namely :— Mah. II of 2010.

(*i*) for the period of first five years, seven years and ten years from the date of commencement of the Tourism Project situated in Zone A, Zone B and Zone C, respectively, no duty ;

(*ii*) for the next period from the sixth year, eighth year and eleventh year from the date of commencement of the Tourism Project situated in Zone A, Zone B and Zone C, respectively, full amount of entertainment duty leviable at the rate specified in clause (*b*) of sub-section (*1*) or, as the case may be, any other sub-section of section 3, applicable to the type of entertainment provided in the said Tourism Project, from time to time :

Provided that, the entertainment duty leviable shall also be subject to the provisions of sub-section (*2*) of section 3, wherever applicable.

*Explanation*.— For the purposes of this sub-section,—

(*i*) the date on which the eligibility certificate is issued by the Tourism Development Corporation under the Tourism Policy-2006, shall be deemed to be the date of commencement of the said Tourism Project ;

(*ii*) the change in the management of Tourism Project, or the change in the name of the Tourism Project shall not be construed as a fresh commencement of the Tourism Project.

(*b*) The concession in entertainment duty as provided under clause (*a*) shall be available to the proprietor of the Tourism Project subject to the following terms and conditions, namely :—

(*i*) the Tourism Project situated in Zone A, Zone B and Zone C, shall be continued continuously for a period of ten years, fourteen years and twenty years, respectively ;

*(ii)* the facilities provided in the Tourism Project, as specified in the Tourism Policy-2006, shall not be discontinued or curtailed without the prior permission of the State Government;

*(iii)* there is no violation of the terms and conditions specified as per the Tourism Policy-2006.

*(c)* In case of violation of condition *(i)*, *(ii)* or *(iii)* of clause *(b)*, the concession shall be liable to be withdrawn and the entertainment duty shall be levied and collected from the date of commencement of the Tourism Project, at the rate specified in, clause *(b)* of sub-section *(1)*, or, as the case may be, any other sub-section of section 3, applicable to the type of entertainment provided, from time to time, in the said Tourism Project alongwith the interest leviable at the rate specified in section 9B :

Provided that, if for any reason the concerned Tourism Project was not continued for the prescribed period, the entertainment duty shall be levied and collected from the date of commencement of the Tourism Project, at the rate specified in, clause *(b)* of sub-section *(1)*, or, as the case may be, any other sub-section of section 3, applicable to the type of entertainment provided, from time to time, in the said Tourism Project alongwith the interest leviable at the rate specified in section 9B.

*Explanation.*— For the purpose of this sub-section,—

*(a)* Zone A shall comprise of the area falling within the limits of Mumbai Suburban District, Mumbai, Navi Mumbai, Thane and Pune Municipal Corporations and Pimpri-Chinchwad Municipal Corporation;

*(b)* Zone B shall comprise of all other areas falling within the limits of all Municipal Corporations not included in Zone A and areas falling in 'A' Class Municipal Councils;

*(c)* Zone C shall comprise of all other areas within the limits of all districts of the Maharashtra State not included in Zone A and Zone B.".

Mah. Ord. XXIII of 2009.

Repeal of Mah. Ord. XXIII of 2009 and saving.

**4.** *(1)* The Bombay Entertainments Duty (Amendment) Ordinance, 2009, is hereby repealed.

*(2)* Notwithstanding such repeal, anything done or any action taken (including any notification or order issued) under the principal Act, as amended by the said Ordinance, shall be deemed to have been done, taken or issued, as the case may be, under the corresponding provisions of the principal Act, as amended by this Act.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH